# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक २८.०७.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २७.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ६,५५,५४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन ३,४००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,००९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९२,५५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २६.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २७.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १०.०४.२०२६ चे १७.४५ वा. ते १९.१५ वा. चे दरम्यान, फिर्यादी शाम मधुकर जोगे वय ५३ वर्षे रा. हंसापुरी खदान, मोटघरेपुरा, हनुमान मंदीर जवळ, तहसील नागपुर यांनी त्यांची हिरो होन्डा सीडी डिलक्स गाडी क्र. एम.एच. ३१ बीएम ५७५५ हे पोलीस ठाणे लकडगंज हद्यीत, सर्वोदय बिल्डींग समोर, दारोडकर चौक, लकडगंज येथे लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना एका हिरो होंडा सीडी डिलक्सवर एक इसम संशयीतरित्या दिसून आल्याने, त्यास थांबवून वाहन चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव तेजराम उर्फ तेजस जगदीश आडे वय ३१ वर्षे, रा. मु. कोंडा, ता. पवनी, जि. भंडारा असे सांगितले. त्यास वाहनाबाबत विचारणा केली असता, त्याने उडवा—उडवीचे उत्तरे दिल्याने त्याला ताब्यात घेऊन पथक कार्यालयात आणून, वाहनाबाबत पडताळणी केली असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे लकडगंज येथील दाखल वाहनचोरीच्या गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे सपोनि. श्रीमती मंगला हरडे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.




**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारणाऱ्या पाहिजे आरोपींना अटक.</u>**

फिर्यादी श्रीमती गायत्री निकेश सुर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा. बिल्डींग नं. ४२, क्वॉर्टर नं. १, आवास योजना, सिम्बायोसिस कॉलेज जवळ, वाठोडा, नागपुर यांचे मुलास मारहाण करुन, जिवे ठार केलेल्या एकूण ०९ आरोपीतांविरुध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १०३(२),१०९(१),६२(२)(अ),१९१(३),१९० भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तापासादरम्यान पोलीस ठाणे अजनी येथील तपास पथकाने यापुर्वी ०५ आरोपी व हुडकेश्वर पोलीसांनी ०२ आरोपी असे एकुण ०७ आरोपींना अटक केली होती. इतर दोघांचा शोध सुरु होता.

गुन्हयाचा पाठपुरावा करीत असतांना, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, हुडकेश्वर येथील खुनाचे गुन्हयातील पाहिजे दोन इसम हे पोलीस ठाणे कोराडी मंदीर परिसरात फिरत आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरून दिनांक २७.०७.२०२६ रोजी २३.०० ते २३.५० वा. चे दरम्यान परिसरात पाहणी करुन, सापळा रचून दोन इसमांना ताब्यात घेतले. त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) पियुष नारायण बघेल वय १९ वर्ष रा. ज्ञानेश्वर नगर, अजनी, नागपूर असे सांगितले. दुसरा इसम हा विधीसंघर्षीत बालक असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांना पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली. पोनि. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा. नजिर शेख, प्रविण भगत, राजेंद्र टाकळीकर, गणेश ठाकरे, रुपेश नानवटकर, राजुसिंग राठोड व चापोअं. सुधिर तिवारी यांनी केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना एका नंबरप्लेट नसलेल्या यामाहा दुचाकीवर एक इसम संशयीतरित्या दिसून आला. त्यास हटकले असता, तो वाहनासह पळून जाऊ लागला. पोलीसांनी त्याचे वाहनाचा पाठलाग करुन, त्यास थांबविले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरेश पुनाराम वर्मा वय २८ वर्षे, रा. दंतेश्वरी झोपडपट्टी, देवनगर, ऑरेंज सिटी हॉस्पिटलमागे, गोंड मोहल्ला, शिवनगर, नागपूर असे सांगितले. त्यास वाहनाबाबत विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने, त्याला ताब्यात घेऊन पथक कार्यालयात आणून, वाहनाबाबत पडताळणी केली असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे बजाजनगर हद्यीतील चोरीचे गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन काळ्या रंगाची विना नंबरप्लेटची यामाहा आर—१५ जिचा मुळ क्र. एमएच ३६ एएच ९८१७ आहे तसेच, ०१ मोबाईल फोन असा एकूण १,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा. राजेंद्र टाकळीकर व त्यांचे पथकाने केली.




**५) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक २७.०७.२०२६ चे १७.४० ते १६.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे तहसील हद्दीत हद्यपार आरोपी व गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना सरकारी सुलभ शौचालयासमोर, टिमकी येथे एक इसम संशयीतरित्या दिसून आल्याने, त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने आपले नाव सक्षम उर्फ बोंडा प्रेमनाथ मौदेकर, वय २३ वर्षे, रा. परमात्मा एक बॅक मागे, गोळीबार चौक, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी खंजीर कि. ५००/—रु. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस युनिट कार्यालय येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. २३/२०२६ दिनांक ११.०६.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी हत्यार बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भाहका सहकलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव तहसील पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि. अमित देशमुख, सफौ. ईश्वर खोरडे, पोहवा. मनोज नेवारे, विजय श्रीवास, पोअं. मनिष रामटेके, चंद्रशेखर डेकाटे व चापोअं. प्रमोद देशभ्रतार यांनी केली.



**<u>६) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक शस्त्रासह ताब्यात.</u>**

दिनांक २७.०७.२०२६ चे १९.४० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २, पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, दोन इसम शस्त्रासह महाराजबाग परिसरातील आतमधील मुख्य रस्त्यावर फिरत आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचे इसम संशयीतरित्या दिसून आले. पोलीसांनी त्यांना हटकले असता, ते पळु लागल्याने त्यांचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव १) आकाश उर्फ गोलु उर्फ कचरा शंभु सिडाम वय २४ वर्षे, रा. दाते ले—आऊट, यादवचे घरी किरायाने, जयताळा, एमआयडीसी, नागपुर असे सांगीतले. दुसरा इसम विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे ताब्यात एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ३००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन युनिट कार्यालय येथे आणून त्यांचा गुन्हे अभिलेख तपासला असता, पोलीस ठाणे सिताबर्डी येथे दाखल कलम ३०४(४) भा.न्या.सं. या जबरी चोरीचे गुन्हयात त्यांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा. ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. नरेश तुमडाम, कमलेश गणेर, प्रविण शेळके, पोअं. संतोष चौधरी व प्रविण चव्हाण यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे अजनी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०७.२०२६ चे ११.३० वा. ते १६.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत फ्लॅट क्र. ३०२, जय उमिया शांति अपार्टमेंट, संतोष पकोडेवाला दुकानमागे, शुभनगर, अजनी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी सुनिल साहेबराव येवले वय ३५ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह हॉस्पिटल येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख २५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,९५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि. कैलास अलोरे ७५०७९६३१५३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक २७.०७.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, एक अनोळखी महिला वय अंदाजे ४० वर्षे वयाच्या, आजारी अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना दक्ष नागरिकाने उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, वार्ड क्र. ३९ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २८.०७.२६ चे ०३.०० वा. डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. सुमेधकुमार जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :—** सौ. स्नेहा पवन मासुलकर वय २४ वर्षे सोबत प्रित पवन मासुलकर वय २ वर्ष दोन्ही रा. समता नगर, गली क्र. १४, गुप्ताचे घरी किरायाने, कपीलनगर, नागपूर हया दिनांक ०७.०७.२०२६ चे १८.०० वा. पासुन पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट, केस—काळे लांब, अंगात— काळया रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह— खांद्यावर डावे बाजुला मस्सा आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :—** कु. रितीका हर्ष माकड वय २६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३५७, गुरुनानकपुरा, कमाल चौक, पाचपावली नागपूर ही दिनांक २४.०७.२०२६ चे ०७.४५ वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली

नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट ६ इंच, केस–काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा कटसुट घातलेला आहे. भाषा–पंजाबी/हिंदी बोलते. ओळख– उजव्या गालावर तिळ आहे.

**३) पोलीस ठाणे कपीलनगर :–** कु. रुबिया परविन मोहम्मद अमजद अन्सारी वय १८ वर्षे, रा. जगदंबा नगर, म्हसाळा टोळी, हिंदुस्थान किराणा स्टोअर्सजवळ, उप्पलवाही, नागपूर ही दिनांक ०९.०७.२०२६ चे ०२.०० वा. पासुन पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस–काळे लांब, अंगात– पांढरा टॉप व काळा बुरखा घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलते. ओळख– गळयावर डावे बाजुस तिळ आहे.






सौ. स्नेहा प्रित कु. रितीकु कु. रुबिया

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१९०८ /२००६ | कलम ३२५ भा.दं.वि. | अलेक्झांडर पेड्रीक इब्राहम रा. गौरी कॉलनी झोपडपट्टी, इमामवाडा, नागपूर | ३१.०७.२०२६ |
| २. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०५००४ २/२००१ | कलम ३७९ भा.दं.वि. | नितीन हेमराज पराते वय २७ वर्ष रा. टिमकी पोलीस चौकी समोर, जगन मेंगरे यांचे घरा जवळ तहसील, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ३ | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०१४६३ /२००६ | कलम ४६१, ५११ भा.दं. वि. | मनोज अर्जुन समरवार वय २३ वर्ष रा. मिनी माता नगर, बुध्द विहारजवळ, उत्तम गली, केळवदकरचे घरी किरायाने, कळमणा, नागपूर | १०.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**